महाराष्ट्र शासनाचा २०२३-२०२४ या वर्षाचा
अर्थसंकल्प विधानसभेला सादर करताना

# श्री. देवेंद्र फडणवीस

## उपमुख्यमंत्री (वित्त)

यांनी गुरुवार, दिनांक ९ मार्च २०२३ रोजी
केलेले भाषण

भाग - दुसरा

*

मा. अध्यक्ष महोदय,

मी आता अर्थसंकल्पाचा भाग- दोन मा. सभागृहासमोर सादर करीत आहे.

१. सन २०२२-२३ या आर्थिक वर्षासाठी राज्याचा स्वतःच्या कर महसूलाचा सुधारित अंदाज रुपये दोन लाख पंचाहत्तर हजार सातशे शहाऐंशी कोटी आहे. यामध्ये वस्तू व सेवाकर, मुल्यवर्धित कर, मुद्रांक शुल्क व नोंदणी फी, राज्य उत्पादन शुल्क या करांचा वाटा दोन लाख त्रेचाळीस हजार चारशे अकरा कोटी आहे.

२. सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी राज्याचा स्वतःच्या कर महसूलाचे अर्थसंकल्पीय उद्दिष्ट रुपये दोन लाख अठ्ठ्याण्णव हजार एकशे एक्क्याऐंशी कोटी एवढे निश्चित करण्यात आले आहे. राज्य शासनातर्फे प्रस्तावित असलेल्या विविध आर्थिक उपाययोजनांमुळे हे उद्दिष्ट पूर्ण होईल याची मला खात्री आहे.

३. महिला सक्षमीकरण, करदात्यांना सवलती आणि शासनाच्या महसूलात वृद्धी होऊन अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी मी पुढील प्रस्ताव सादर करीत आहे.

**महिलांना व्यवसाय करात सवलत**

४. नोकरी करणाऱ्या महिलांना सध्या मासिक १० हजार रुपये पेक्षा अधिक वेतन असल्यास व्यवसाय कर भरावा लागतो. महिलांची क्रयशक्ती वाढविण्यासाठी ही मर्यादा वाढवून २५ हजार रुपये करण्याचे प्रस्तावित करीत आहे. त्यामुळे मासिक २५ हजार रुपये पर्यंत वेतन असलेल्या महिलांना कोणताही व्यवसायकर भरावा लागणार नाही.

**दिव्यांग व्यक्तींना व्यवसाय करातून सूट**

५. व्यवसाय कर अधिनियमामध्ये 'दिव्यांग व्यक्तीची' व्याख्या दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ नुसार सुधारित करण्याचे प्रस्तावित आहे. या सुधारणेमुळे व्यवसायकर सुटीसाठी पात्र ठरणाऱ्या दिव्यांग व्यक्तीच्या संख्येत वाढ होईल. तसेच व्यवसाय करातून सूट देण्याची प्रक्रिया सोपी होईल.

**विमान चालन चक्की इंधनावरील (ATF) मुल्यवर्धित करात सवलत**

६. हवाई वाहतुकीला प्रोत्साहन आणि आर्थिक विकासाला गती देण्याच्या उद्देशाने बृहन्मुंबई महानगरपालिका, पुणे महानगरपालिका आणि रायगड जिल्हा या भौगोलिक क्षेत्रात विमान चालन चक्की इंधनावरील (ATF) मुल्यवर्धित कराचा दर २५ टक्के वरुन बंगलोर व गोव्याच्या समकक्ष १८ टक्के करण्याचे प्रस्तावित करीत आहे.

**राज्यकर विभागाची अभय योजना**

७. वस्तू व सेवा कर कायदा लागू होण्यापूर्वी राज्यकर विभागातर्फे राबविण्यात आलेल्या विविध कायद्यांच्या संदर्भात ‘ महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती व विलंब शुल्क यांच्या थकबाकीची तडजोड योजना - २०२३ ’ ही अभय योजना मी जाहीर करीत आहे. या अभय योजनेचा कालावधी दिनांक ०१ मे, २०२३ ते दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२३ असेल. दिनांक ०१ मे, २०२३ रोजी प्रलंबित असलेल्या थकबाकीसाठी ही योजना लागू राहील.

८. वैधानिक आदेशानुसार कोणत्याही वर्षासाठीची, व्यापाऱ्याची थकबाकी रुपये दोन लाखांपर्यंत असल्यास, सदर रक्कम त्यावर्षासाठी पूर्णपणे माफ करण्याचे प्रस्तावित आहे. या अभय योजनेचा लाभ लहान व्यापाऱ्यांना अंदाजे एक लाख प्रकरणात होईल.

९. कोणत्याही वैधानिक आदेशानुसार व्यापाऱ्यांची थकबाकी रुपये पन्नास लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा प्रकरणात एकूण थकबाकीच्या २० टक्के रक्कम भरल्यास उर्वरित ८० टक्के रकमेस माफी देण्यात येईल. लहान व मध्यम व्यापाऱ्यांना याचा लाभ अंदाजे ऐंशी हजार प्रकरणांत होईल.

वरील प्रस्तावांना सन्माननीय सदस्यांचा पाठिंबा मिळेल, असा माझा विश्वास आहे.

आज **तुकाराम बीज** असल्याने श्री जगद्‌गुरु संत तुकाराम महाराजांचे अभंग माझ्या भाषणात आले आहेत.

तुकोबाराय म्हणायचे

**स्वप्नींही दुःख कोणी न देखे डोळा.....हीच त्यांची रामराज्याची संकल्पना होती.**

ज्ञानोबा माऊली म्हणतात...

**दुरितांचे तिमिर जावो। विश्व स्वधर्म सूर्ये पाहो ।**
**जो जे वांछिल तो ते लाहो। प्राणिजात ।।**

या अर्थसंकल्पाचा हाच प्रासादिक संदेश आहे,
तीच आमची प्रामाणिक भावना आहे.

तशीच कृती राज्य सरकारकडून होईल.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !!**

*********